# प्रकरण सहावे

# निष्कर्ष

# प्रकरण सहावे

# निष्कर्ष

आतापर्यंत पाच प्रकरणात नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' आणि 'सांजरंग' या कादंबऱ्याचा सांगोपांग अभ्यास केला. या शेवटच्या प्रकरणात आतापर्यतच्या विवेचनातून हाती आलेले निष्कर्ष मांडावयाचे आहेत.

मराठी साहित्य प्रकारातील कादंबरी हा एक आधुनिक ललित वाङ्मय प्रकार आहे. मराठी कादंबरी वाङ्मयाचे समृध्द दालन लक्षात घेता, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय कल्पनारम्य प्रादेशिक ग्रामीण दलित मनोविश्लेषणात्मक अशा कादंबऱ्यांची निर्मिती झाली आहे. 'कादंबरी' आणि इतर वाङ्मय प्रकाराची तुलना करताना 'कादंबरी' वाङ्मय प्रकारचे श्रेष्ठत्व जाणवते. या वाङ्मय प्रकाराने लोकप्रियता मिळवली आहे. कादंबरीने नाटक, कथा, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, पत्र, या सर्व प्रकारचे गुणविशेष पचविले आहेत व ती विशाल बनली आहे.

मराठीतील पहिली कादंबरी म्हणून बाबा पद्मनजींची 'यमुना पर्यटन' या कादंबरीकडे पाहिजे जाते. कादंबरी हा समाज वास्तवनिष्ठ असा साहित्यप्रकार आहे. मानवी मन, जीवन आणि त्या भोवतीचा समाज यांच्या प्रत्ययकारी चित्रणासाठी कादंबरी लिहिली जाते. आपल्या कादंबरीतून जे विश्व कादंबरीकार उभे करीत असतो त्याद्वारे त्याला आपली म्हणून काही विशिष्ट भूमिका स्पष्ट करावयाची असते.

भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले यांची सामाजिक चळवळ आणि त्यांचे तत्वज्ञान यांपासूनच निर्माण झालेल्या ग्रामीण चळवळीतून ग्रामीण साहित्याचा जन्म झाला. या साहित्य निर्मितीला दलित साहित्याचा एक नवा प्रवाह येऊन मिळाला. दलित साहित्याच्या प्रेरणेचा विचार करता डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या साहित्याचे एकमेव प्रेरणास्थान आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारातून, तत्वज्ञानातून दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे. हजारो वर्षे अंधारात खितपत पडलेल्या दलित समाजाला डॉ. आंबेडकरांनी आत्ममानाचा प्रकाश दिला. व त्यातून दलित साहित्याची निर्मिती झाली.

दलित साहित्याचे प्रेरणा व स्वरुप लक्षात घेतले आहे. डॉ.आंबेडकरांच्या ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' या संदेशामुळे दलित समाजात नवचैतन्याची लाट उसळली. तो शिकू लागला. शिक्षणाने त्याची याचनेची वृत्ती नृष्ट होऊन तो जागृत झाला. त्याला आत्मभान आले. त्यातून तो आपली व्यथा, वेदना शब्दब्धद करु लागला. मराठी वाङ्मयात 'दलित साहित्य' हा वेगळा व नवा साहित्य प्रकार उदयास आला. या प्रभावी जीवनवादी साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमुळे मराठी वाङ्मयाचे अनुभवक्षेत्र रुंदावले आज दलित साहित्य हा एक महत्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतून व तत्वज्ञानातून दलित साहित्य प्रवाह उदयास आलेला आहे.

नवे नवे साहित्य प्रवाह उदयाला येणे हे त्या भाषेच्या जीवंतपणाचे लक्षण असते नवे प्रवाह साहित्य समृध्द करीत असतात. त्यामुळे साहित्यात चैतन्य टिकून राहते. दलित साहित्याचा विचार करतांना निष्कर्ष काढता येतो की नित्य नव्या जाणिवांतून जे लेखन होत गेले. त्यामुळेच तर मराठी साहित्य समृध्द होत राहिले आहे. इंग्रजी राजवटीत मराठीतील बहुसंख्य लेखक पांढरपेशा मध्यमवर्गीतील असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ह्यात बदल झालेला आढळतो. शिक्षण ही कोणा एका वर्गाची मक्तेदारी राहिली नाही. शिक्षणाचा प्रसार झाला आणि त्यामुळे समाजातले उपेक्षित स्तर जागृत होवू लागले व ते आपले अनुभव व्यक्त करु लागले. आपले अनुभव व्यक्त करण्याची ओढ समाजाच्या सर्व थरातून निर्माण होऊ लागली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे उपेक्षित आहेत, जे दबले गेले होते, जे शिक्षित होते, जे विशिष्ट समाज व्यवस्थेमुळे अमानुष जीवन जगत होते त्यांचा स्वर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह त्यांच्याच लेखनातून व्यक्त होऊ लागले. तेच दलित साहित्य हा मराठी साहित्यातील एक नवा प्रवाह आहे हा निष्कर्ष मला येथे आवर्जून नोंदवावा वाटतो.

दलित साहित्यामध्ये काव्य, कथा, आत्मकथन हे वाङ्मय प्रकार समृध्द ठरले आहेत. पण दलित कादंबरी तितकीशी बहरली नाही. थोर कादंबरीकार अण्णाभाऊ साठे किंवा शंकरराव खरात यासारख्या दलित कादंबरीकारांनी कादंबरी लेखन केले असले तरी हा प्रकार दलित साहित्याच्या दृष्टीने प्रबळ झाल्याचे दिसत नाही तरीही बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, योगेंद्र मेश्राम, अशोक व्हटकर, सुधाकर गायकवाड,

भिमसेन देठे, शरणकुमार लिंबाळे, उत्तम बंडू तुपे इ. कादंबरीकार दलित जीवन आणि त्यांच्यातील गुंतागुंती, नव्याने निर्माण झालेल्या समस्या यांचा समर्थपणे वेध घेतात तशाच पध्दतीने चिंतनात्मक दृष्टीकोन ठेवून नामदेव कांबळे यांनी दारिद्रय, उपासमार आणि परावलंबित्व यांच्याशी झगडणाऱ्या मांग कुटुंबाची कहाणी रेखाटली आहे. मांग समाजातील अनिष्ठप्रथा व रुढी विरुध्द असलेला असंतोष, दारिद्रय, उपासमार या परिस्थितीत शिक्षण घेण्यासाठी केलेला संघर्ष 'उनसावली' आणि 'सांजरंग' मध्ये नामदेव कांबळे यांनी रेखाटला आहे.

नामदेव चं. कांबळे यांनी आपल्या जीवनाची वाटचाल अत्यंत प्रतिकूल परिस्थिती करुन एक चांगला लेखक म्हणून नावलौकिक मिळवला आहे. अकल्पित, प्रत्यय, तो ती अन्वयार्थ असे कवितासंग्रह, 'परतीबंद' कथासंग्रह, तर 'अस्पर्श', 'राघववेळ', 'उनसावली', 'मोराचे पाय', 'सांजरंग', 'शेलझाडा', असे कादंबरीलेखन तसेच 'स्मरणविस्मरण' हा ललित लेख संग्रह लिहून विपुल लेखन केले आहे.

१९७५ नंतरच्या दलित कादंबरीकारामध्ये श्री.कांबळे हे महत्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्ववाचे काही पैलू त्यांच्या लेखनशैलीमधून प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत. दलित जीवन अनुभवलेल्या कांबळे यांनी त्यांना आलेल्या जीवन अनुभवाचे नाते वाङ्मयाशी जोडले आहे. एक दलित म्हणून वाट्याला आलेल्या जीवनानुभवाला ते समंजसपणाने आक्रस्ताळेपणाची भूमिका न स्विकारता संयमाने सामोरे जातात. आपल्या मनातील विचारांना ते साहित्यकृतीच्या माध्यमातून प्रगट करत राहतात. नामदेव कांबळे यांचे लौकीक जीवन कष्टमय परिस्थितीत गेले आहे. चपराशी ते माध्यमिक शिक्षक म्हणून काम करताना आलेले अनुभव, जीवन विषयक दृष्टिकोन, साहित्यविषयक दृष्टिकोन त्यांच्या साहित्यकृतीतून स्पष्ट झालेला आहे नामदेव कांबळे यांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचा गौरव त्यांना मिळालेल्या विविध पुरस्कारांनी झाला आहे.

'उनसावली' कादंबरीतील कथानकाचा विचार करता, रघूनाथ कळणू जाधव या मांग समाजात, वालंबीच्या पोटी जन्मलेल्या मुलाच्या शैक्षणिक प्रवासाची वाटचाल चित्रित झाली आहे. त्याचे पुसद येथे चाललेले महाविद्यालयीन शिक्षण त्याच्या जीवनाला आकार देते. कॉलेजमधील उनाडक्या करणाऱ्या मुलांचे त्यांला आश्चर्य वाटते. या काळात रघूला श्री.देवकाते, कॉलेजचे प्राचार्य यांच्याकडून मदत होत राहते. तर मेसमध्ये काम करणारी त्याच्याच जातीतील सारजा आणि तिची तरुण नात गुंफा यांच्या सुखदु:खात काही

दिवस जातात. कॉलेज जीवनात म.जोतीबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केल्यामुळे रघूचा वैचारिक व बौध्दीक विकास होतो. तो प्रगल्भपणे विचार करु लागतो. त्यातून रघूच्या मनात उत्पन्न झालेले प्रश्न संघर्षाच्या, परिवर्तनाच्या दिशेने त्यांची वाटचाल करतात. रघूच्या विद्रोहाला विवेकदृष्टी प्राप्त झाली आहे.

त्याचबरोबर वालंबीचे कुटुंब, मांग समाज, दलित समाजाच्या व्यथा, वेदना मुखरित केल्या आहेत. वालंबी आणि तिची रघू, सीताराम ही दोन मुले प्रतिकूल परिस्थितीतून वाट काढत कशी पुढे जातात हे कादंबरीतून चित्रित होते. रघूच्या कॉलेज जीवनातील ताणतणाव त्यांच्या मनाचे उलगडत जाणारे पदर डायरी लेखनातून लेखकाने उलगडून दाखविले आहेत. दलित साहित्यात दिसणारा विद्रोह, नकार, बंडखोर वृत्ती यांना समजून घेत पुढे जाणारी 'उनसावली' ही कादंबरी तिच्यातील वास्तवदर्शी चित्रणामुळे परिणामकारक झाली आहे.

हेच या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. विदर्भातील अस्सल बोलीचा नमुना कादंबरीत पहावयास मिळतो. त्यामुळे नामदेव कांबळे यांच्या भाषेला विलक्षण गोडवा प्राप्त झाली आहे. तसेच त्यांची भाषा अल्पाक्षरी असून तिच्यामध्ये अर्थपूर्णता आली आहे. भाषेचे प्रभावी सामर्थ्य यातच त्यांच्या कादंबरीचे यश सामावते आहे. त्यांच्या कादंबरीची प्रसंगानुरुप व पात्रानुरुप बदलत गेलेली भाषा आपुलकीची व जिव्हाळ्याची असल्यामुळे वाचकाला ती सहजपणे आपलीशी वाटते.

'सांजरंग' कादंबरीत महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या फुलसिंग नाईक महाविद्यालयात शिकलेला रघू तेथेच कारकून म्हणून नोकरीस लागतो. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या मंत्रानुसार ज्ञानाची भूक लागलेला रघू शिक्षण घेतो. मात्र आपली परिस्थिती आणि जीवन जाणीवेपासून तुटत नाही. उलट आपल्याबरोबर लहान भाऊ सीतारामला ही शिक्षण घेण्यास प्रेरीत करतो. त्यामुळे तो आपली आणि आपल्या कुटुंबाची प्रगती करु शकतो. मात्र कधीही आपल्या आईशी संघर्ष करीत नाही. मांग समाजातील जीवनाचे चित्रण करीतच रघू जाधव या तरुणाचा विकास घडवित जाणारी ही कादंबरी आहे. दलित कवितेत प्रकट झालेली चीड, विद्रोहाची भावना, अन्यायाविरुध्द बंड करण्याची प्रखर व तिखट क्रांति करण्याची भावना या कादंबरीत कोठेही उग्र रुप धारण करत नाही. उलट वालंबी आणि

रघुच्या व्यक्तिचित्रणातून मुंगी होवून साखर खाण्याची संयमी भूमिका व्यक्त करुन या कादंबरीच्या माध्यमातून नामदेव कांबळे यांनी प्रतिष्ठीतांनाही अंतर्मूख केले आहे. दलित 'सूर्यकुला' तले असल्याने नामदेव कांबळे यांच्या कादंबरीत गौतम बुध्द, चोखामेळा, फुले, आंबेडकर विचारांच्या परंपरांचे वलय आहे. या दोनही कादंबऱ्यातून व्यक्तिगत जीवनाचा पट असा रंगविला आहे की व्यक्तिसंबंध स्वरुपात जाणवलेला अनुभव व्यक्तीसंबंधता गळून त्याच्या जीवनाला सर्वांगांनी स्पर्श धरु शकते

नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन्ही कादंबरीतील आशय अभिव्यक्ती स्पष्ट झाली आहे. कांबळे यांच्या कादंबरीने दलित कादंबरीच्या कक्षा रुंदावल्या आहेत. तसेच फुले-आंबेडकरी विचार व्यक्त झाला आहे. कादंबरीतील नायक रघू हा शोषित वर्गाचा प्रतिनिधी असला तरी नव्या सुशिक्षित पिढीतील तरुणाचे तो प्रतिनिधीत्व करतो. 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यांचा संयुक्तपणे विचार करता दलित समाजातील दु:ख, नव्या व जुन्या पिढीतील ताणतणाव, विद्यापीठ नामांतर लढ्यातून प्रतिगामी आणि पुरोगामी विचारांचा संघर्ष, मांग समाजातील श्रध्दा-अंधश्रध्दा, दलित स्त्रीचे दलित समाजातील स्थान व स्त्री म्हणून तिच्या पदरी पडणारी अवहेलना, धर्मांतरीत दलित समाज आणि धर्मांतर न केलेले दलित घटक यांच्यातील परस्पर ताणतणाव, फुले आंबेडकरी विचार या महत्वपूर्ण गोष्टींचा विचार केला आहे.

या दोन्ही कादंबऱ्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना हात घातला आहे. बदलत्या सामाजिक वास्तवाचे कादंबरीकाराने प्रामाणिक चित्रण केले आहे. कादंबरीतील मातंग समाजाचे चित्रण लक्षात घेता, मातंग समाजने काळानुरुप सामाजिक व सांस्कृतिक बदल स्विकारणे गरजेचे आहे. आजही सामाजिक परिवर्तन व वैचारिक प्रबोधनाची मातंग समाजाला फार मोठी गरज आहे.

साहित्य ही थोर कलारुप शक्ती आहे. समाजातील घडत असते. तेच साहित्यात प्रकट होते. आणि जे साहित्यात असते तेच समाजात पहावयास मिळते. समाज आणि साहित्य एकमेकांच्या हातात हात घालून वाटचाल करीत असतात. मानवी जीवनाच्या विविध अंगाने दर्शन साहित्यात घडत असते. सृष्टिच्या सत्य स्वरुपाचे लेखकाच्या सभोवतालच्या वातावरणाचे दर्शन साहित्यात घडत असते. मानवी जीवन, निसर्ग, सभोवतालचे भौगोलिक वातावरण, या सर्वांचा परिणाम लेखकाच्या व्यक्तीमत्वावर होत असतो. लेखकाचे व्यक्तिमत्व हे त्याच्या वाङ्मयाचे मूळ असते व लेखकाने घेतलेले जीवनानुभव हीच त्याच्या

साहित्यनिर्मितीची बिजभूत शक्ती असते. त्यामुळे व्यक्ती, समाज व जीवन यांचे मिश्र प्रतिबिंब साहित्यात उमटत असते.

त्या त्या काळातील वास्तव साहित्यिकाच्या साहित्यात उमटत असते. सभोवतालचे सामाजिक जीवन हे माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो. म्हणून साहित्य, साहित्यिक व त्याच्या सभोवतालचे वातावरण आणि त्यांचे एकमेकांतील अन्योन्य संबंध असतात व हे संबंध अतूट असतात. जीवनाला पाठ दाखवून साहित्यनिर्मिती होवूच शकत नाही. उदा. हरिभाऊ आपटे यांचे साहित्य त्यांच्या साहित्यात व्यक्तिगत संस्काराबरोबरच त्याच्यावरील सामाजिक संस्काराचे पडसाद उमटलेले आढळतात. लेखकाची घडण ही समाजातच होत असते त्यामुळे स्वाभाविकपणेच लेखकाची व्यक्तिनिष्ठता आणि समाजनिष्ठता ललित साहित्यात उमटते

बाराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या कालखंडातील समाजविचार, चालीरीती, रुढी, परंपरा आणि तत्कालीन स्थित्यंतराचे दर्शन संत साहित्यातून प्रकट होतात. संतसाहित्य अध्यात्म प्रवण होते. पुढील काळात अध्यात्मापेक्षा लौकीकेला महत्व आले. पुढे यंत्रयुगाचे परिणाम व जीवनात झालेले बदल साहित्यातून उमटू लागले. कार्ल मार्क्स, म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचाराचे व तत्वज्ञानाचे पडसाद साहित्याद्वारा प्रकट होऊ लागले. साहित्य ही एक अशी कला आहे की, जी मानवी मनावर भावनात्मक जागृती घडवून आणते. साहित्याचा परिणाम समाज, देश तसेच तत्कालीन युगावर होत असतो.

इ.स.१९२० नंतर म. गांधीजींच्या चळवळीचा तत्वज्ञानाचा प्रभाव मराठी साहित्यावर पडू लागला त्यामुळे मराठी साहित्यातील ग्रामीण चळवळ अधिकच तीव्र बनली. ग्रामीण साहित्यात ही मध्यम वर्गीय जीवनाचे चित्र रेखाटले जाऊ लागले. उपेक्षित समाज मात्र या ग्रामीण साहित्यापासून वंचित राहिला. १९५० नंतर 'खेड्याकडे चला' या महात्मा गांधीजींच्या चळवळीने उसळी मारली व सर्वांची नजर खेड्यावर स्थिर झाली. आणि ग्रामीण साहित्य जोमाने वाढू लागले, औद्योगिक क्रांतीमुळे खेड्याचे भौतिक जीवनमान बदलले. व खेडी ही स्वावलंबी परिपूर्ण बनू लागली. १९५० च्या दरम्यान ग्रामीण साहित्यात दुसऱ्या महायुध्दाचे संदर्भ उमटू लागले पहिली सुशिक्षित पिढी उदयाला आली व अस्सल ग्रामीण साहित्य निर्मिती होऊ लागली. पुढील काळातील लेखकाने मागील काळातील लेखकांचे अनुकरण केले व अनुकरणीय अशी साहित्य निर्मिती होऊ लागली

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित चळवळीमुळे त्यांच्या विचार व तत्वज्ञानामुळे युगेनयुगे उपेक्षित राहिलेला गावकुसाबाहेरील दलित समाज खडबडून जागा झाला. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या बाबासाहेबांच्या घोषणेने ग्रामीण साहित्याला समांतर अशा दलित साहित्याचा उमग झाला आणि अत्यंत कमी काळात वेदना विद्रोह नकार आणि उद्रेक व्यक्त करणारे साहित्य नावारुपाला आले. अशा प्रकारे मार्क्सवाद, फुलेवावद, आंबेडकरवाद या त्रिवेणी तत्वज्ञानाच्या संगमातून मानवतावादी असे दलित साहित्य इ.स.१९६० च्या पुढील काळात उदयाला आले. दलित साहित्याने दलितांची दु:खे वास्तवरुपाने मांडली. ती मांडत असताना समता, स्वातंत्र्य, न्याय आणि विश्वबंधुत्व यांच्या दलित साहित्याने पुरस्कार केला. 'माणूस' हाच या साहित्याने केंद्रबिंदू मानला. बुध्द, कबीर, फुले, आंबेडकर यांचा वारसा सांगणारे दलित साहित्य अल्पावधीत सर्व जगभर पोहचले. दलितांची दु:खे दलित साहित्याने प्रकाशात आणली. आणि दलितांना प्रतिष्ठा प्राप्.त करुन दिली.

दलित वाङ्मयाच्या प्रवाहात 'दलित कादंबरी' ही प्रामुख्याने कमी प्रमाणात आहे. किंबहुना दलित कादंबरीचा प्रवाह इतर दलित वाङ्ग्याच्या प्रकाराच्या मानाने क्षीण प्रवाह असे असूनही नामदेव कांबळे यांनी सहा कादंबऱ्या लिहून या क्षीण प्रवाहाला गती देण्याचा प्रयत्न केला आहे. ही गोष्ट स्वागतार्ह आहे. त्यांच्या कादंबरी लेखनाच्या प्रेरणेने दलित कादंबरीचा क्षीण प्रवाह गतिमान होईल व दलित कादंबरी वाङ्मयाला उज्ज्वल परंपरा प्राप्त होईल यात शंका नाही.

अशा प्रकारे एकुण पाच प्रकरणांमध्ये नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यांच्या अभ्यासावरुन या कादंबऱ्यांना चांगल्या कलाकृतीचे रुप प्राप्त झाले आहे. वेधक कथानक, जीवंत व वास्तव घटना प्रसंग, संयमी नायक-नायिका, संवाद कौशल्य अल्पाक्षरी परंतु अर्थपूर्ण भाषाशैली व वास्तव आणि सकस अनुभाविष्कार या सर्व वाङ्मयीन गुणांचा आढळ या कादंबरीत प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळेच नामदेव कांबळे यांनी केलेली प्रचंड साहित्य निर्मिती म्हणजे सकस व प्रगल्भ जीवनानुभवातून कारुण्याच्या आविष्कारातून झालेली अजरामर अंशी साहित्यनिर्मिती होय.